**(CNR No.:-MHSN06-002345-2018)**
**(महाराष्ट्र शासन विरुध्द संगिता नंदु गायकवाड–इतर )**

# नियमित फौजदारी खटला क्रमांक २१८/२०१८ मधील निशाणी १३० व १३१ वरील एकत्रित आदेश

(दिनांक ०४/०६/२०१९)

निशाणी १३० वरील अर्ज हा अधीक्षक, आशाकिरण शासकीय महिला वसतिगृह, कराड यांनी दिलेला आहे. त्यामध्ये या कामातील चार महिलांना त्यांच्या वसतिगृहात ठेवणेबाबत झालेल्या आदेशाप्रमाणे एक वर्ष पूर्ण झाल्याने त्याबाबत पुढील आदेश होणेकरिता विनंती केलेली आहे. तसेच निशाणी १३१ वर सहाय्यक पोलीस निरीक्षक, महात्मा गांधी चौक पोलीस ठाणे, मिरज यांनी या कामातील पिडीत महिलांना मुक्त केल्यास त्या पुन्हा देहविक्री व्यवसायामध्ये सक्रीय होतील अशी शक्यता व्यक्त करुन त्यांना महिला सुधारगृहात प्रशिक्षण व समुपदेशन करणेकरिता एक वर्ष मुदत वाढ होणेबाबत आदेश होणेस विनंती केलेली आहे.

२. यावर सरकारी वकीलांनी एकत्रितरित्या निशाणी १३२ येथे म्हणणे दाखल केलेले आहे. सरकारी वकीलांनी आशाकिरण महिला वसतिगृहाच्या अर्जात नमूद प्रमाणे पिडीत महिलांना प्रशिक्षण दिले असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा सदर संस्थेने दाखल केलेला नसून सदर पिडीतांच्या पार्श्वभूमीबाबत मागविलेल्या अहवालानुसार त्यांची कौटुंबिक परिस्थिती योग्य नसल्याने त्यांना संस्थेतून सोडुन दिल्यास त्या पुन्हा त्याच व्यवसायात जाण्याची दाट शक्यता आहे असे कथन करुन सदर महिलांच्या भविष्याच्या दृष्टीने त्यांना

पुढील एक वर्षाकरिता पुनर्वसनासाठी संस्थेत ठेवणेबाबत आदेश होणेकरिता विनंती केलेली आहे.

३. दोन्ही अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रे वाचून पाहिली. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

४. सदर कामी सरस्वती दास, कोनिका बागदी, सुरैय्या शरीफ, रिना सिंग यांना पुनर्वसनासाठी आशाकिरण शासकीय महिला वसतिगृह, कराड येथे दिनांक ०५/०६/२०१८ पासून एक वर्षाकरिता ठेवण्यात आले होते. त्याची मुदत संपल्याने सदर संस्थेने व पोलीसांनी त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने त्यांच्या पुनर्वसनाबाबत पुढील आदेश होणेकरिता सदरचे अर्ज दिलेले आहेत. सदर संस्थेच्या कथनाप्रमाणे त्यांनी पिडीतांना वेगवेगळे प्रशिक्षण दिलेले आहे. परंतु, त्याबाबत त्यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा या कामी दाखल केलेला नाही. सदर पिडीतांच्या गृह अहवालावरुन त्यांची कौंटुंबिक परिस्थिती सद्यस्थितीत चांगली असल्याबाबत कोणताही पुरावा न्यायालयासमोर नाही. त्यामुळे सरकार पक्ष व पोलीस कथन करतात त्याप्रमाणे सदर महिलांना त्यांच्या पूर्वीच्या व्यवसायात परत नेतील किंवा त्यांना त्यामध्ये ओढल्या जाण्याची दाट शक्यता दिसुन येते. अशा परिस्थितीत त्यांचे पुनर्वसन होणे अत्यंत गरजेचे आहे. संबंधीत संस्थेने पिडीतांना दिलेल्या प्रशिक्षणाबाबत कागदपत्रे हजर करावीत. तसेच त्यांच्या पुनर्वसनाकरिता त्यांना पुन्हा त्याच संस्थेत पुढील चार महिन्यांकरिता ठेवणे योग्य वाटते. सबब, मी वरील विवेचनांवरुन खालील आदेश पारित करीत आहे.

# आ दे श

१. सरस्वती गोरांग दास, कोनिका तमाल बागदी, सुरैय्या बीबी शेखशरीफ आणि रिना मनिषकुमार सिंग यांना आशाकिरण शासकीय महिला वसतिगृह, कराड येथे पुढील चार महिन्यांकरिता ठेवण्यात यावे.

२. आशाकिरण शासकीय महिला वसतिगृह, कराड यांनी पिडीतांना दिलेल्या प्रशिक्षणाबाबत योग्य ती कागदपत्रे दाखल करावीत.

३. आशाकिरण शासकीय महिला वसतिगृह, कराड यांना याबाबत कळविण्यात यावे.

४. येणेप्रमाणे आदेश.

सही/-

ठिकाणः मिरज. (निलेश म. वाली)
दिनांकः- ०४/०६/२०१९. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मिरज